# :: प्रेस नोट ::

## आरोपी केशव हिरालाल निपाणे, वय ५३ वर्ष, पद— सदस्य ग्रामपंचायत सेंदुरवाफा ता. साकोली जि. भंडारा यांना कारावासाची शिक्षा

तक्रारदार यांना मागील वर्षी स्वच्छता ग्राम अभियान अंतर्गत स्वत:चे घरी स्वत:चे पैशानी बांधलेल्या संडासाचे पैसे स्वच्छता ग्रामअभियान योजने अंतर्गत मंजूर करून दिल्याचे सांगून त्यांचा मोबदला म्हणून आरोपी केशव हिरालाल निपाणे, वय ५३ वर्ष, पद— सदस्य ग्रामपंचायत सेंदुरवाफा ता. साकोली जि. भंडारा यांनी तक्रारदार यांना ५०००/—रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४५००/— रु स्विकारल्याने त्यांचे विरूध्द दि. २५/०१/२०१६ रोजी पो.स्ट साकोली जि. भंडारा अप क्र ३००३/१६ कलम ९ ला.प्र.का १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

मा. श्री. संजय देशमुख, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, विशेष न्यायधिश, ला.प्र.का. भंडारा यांचे न्यायालयात सदर खटला चालविण्यात आला. दि. २२/८/२०१९ रोजी मा. न्यायालयाने आरोपी केशव हिरालाल निपाणे, सदस्य ग्रामपंचायत सेंदुरवाफा ता. साकोली जि. भंडारा यांना कलम ९ लाप्रका मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व ३०००/— रुपये दंड दंड न भरल्यास ३ महिने आणखी सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास श्री प्रदिप पुल्लरवार, तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी नापोशि भाऊराव वाडीभस्मे लाप्रवि भंडारा यांचे मदतीने पुर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाचे वतीने जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. विनोद भोले यांनी काम पाहिले व त्यांना श्री महेश चाटे, पोलीस उपअधीक्षक श्री योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक, पोहवा रविन्द्र गभने व पोशि संदीप पडोळे व लाप्रवि. भंडारा यांनी सहाय्य केले.

श्रीमती रश्मि नांदेडकर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर परिक्षेत्र तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा यांचे वतीने कोणी खाजगी ईसम लाचेची मागणी करीत असल्यास कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, कार्यालयाशी संपर्क साधावा.

**पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नागपूर**
**दुरध्वनी क्रमांक — ०७१२ —२५६१५२०**
**टोल फ्रि क्रमांक— १०६४**